# प्रेसनोट

दि.२०/०३/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | नेवासा पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) किसन दिंगबर सागर, वय–५५ वर्ष, विशेष लेखा परीक्षक, वर्ग–२, नेमणुक–जिल्हा विशेष लेखा परीक्षक कार्यालय, सहकारी संस्था, अहमदनगर<br>२) तय्यब वजीर पठाण, वय–४८ वर्ष, खाजगी लेखा परीक्षक, रा.जवळे खुा, ता.नेवासा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/– रुपये तडजोडी अंती २,००,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,००,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार हे एका पतसंस्थेचे चेअरमन होते, सदर पतसंस्थेचे लेखा परीक्षण करुन अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी यातील आरोपी लोकसेवक किसन दिंगबर सागर, विशेष लेखा परीक्षक, वर्ग–२, नेमणुक–जिल्हा विशेष लेखा परीक्षक कार्यालय, सहकारी संस्था, अहमदनगर यांना दिले होते. आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांचा नावावरील मुदत ठेवींची रक्कम व्याजासह अहवालात दर्शविणेसाठी व लेखा परीक्षण अहवाल चांगला सादर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३,००,०००/– रुपयांची मागणी केल्याबाबतची तक्रार, तक्रारदार यांनी दिली होती. सदर तक्रारीवरुन दि.१७/०३/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक किसन दिंगबर सागर यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोड अंती २,००,०००/– रुपये लाचेची मागणी आरोपी क्र.२ तय्यब वजीर पठाण यांचे उपस्थितीत केली. मागणी दरम्यान आरोपी क्र.२ यांनी प्रोत्साहन दिले. तक्रारदार यांनी मागणी केलेल्या रकमेपैकी पहिल्या टप्प्यात १,००,०००/– रुपये देण्याची विनंती केली व सदर लाच रक्कम आज दि.२०/०३/२०२३ रोजी बाळू मामा ज्युस सेंटर, नेवासा फाटा येथे आरोपी लोकसेवक क्र.१ किसन दिंगबर सागर यांनी आरोपी क्र.२ तय्यब वजीर पठाण यांचे उपस्थितीत स्विकारली असता दोन्ही आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत नेवासा पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर